# BDC LIBRARY

## New Paper Clipping

### A.Y. 2024-2025

page 4-23-8-2024
23 Aug 2024

दैनिक
एकमेव विचारपत्र
महाराष्ट्र न्यूज

https://mahanewsnet.com/ DailyMaharashtraNewsOfficial 8554047000
@DailyMaharashtraNews Maharshtranewslive @Maharashtranew7

# विद्यार्थ्यांचे कौशल्य विकसित होणे आवश्यक : पाटणकर

* महाराष्ट्र न्यूज नेटवर्क
पाटण, दि. २२ ऑगस्ट : सध्याच्या जागतिकीकरणाच्या काळात रोजगाराच्या संधीचे स्वरूप बदलले आहे. रोजगाराच्या नवनवीन संधीबाबत माहिती नसल्याने किंवा आवश्यक कौशल्य नसल्याने विद्यार्थी रोजगार किंवा उद्योगापासून वंचित राहत आहेत त्यामुळे महाविद्यालयात विविध उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांचे कौशल्य विकसित होणे आवश्यक आहे असे मत कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक श्रीमंत याज्ञसेन पाटणकर यांनी व्यक्त केले.

कोयना एज्युकेशन सोसायटीचे बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण अंतर्गत आय.क्यू.ए.सी. विभाग, लैंगिक छळ प्रतिबंधक समिती आणि नांदी फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रोजगारवर्धन आणि युवा उपजीविका कार्यक्रम महिंद्रा प्राईड क्लासरूम तर्फे आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कोयना एज्युकेशन



सोसायटीचे संचालक श्रीमंत याज्ञसेन पाटणकर तर अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. एस.डी.पवार प्रमुख उपस्थिती म्हणून स्वाती मोरे, आसावरी कुलकर्णी , आय. क्यू.ए.सी.समन्वयक डॉ.एच.व्ही. काटे, डॉ. एस. एस. कुंभार, प्रा. एम. एस. आलदर हे होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. कुंभार यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर कोर्सच्या विद्यार्थिनींनी आपली मनोगते व्यक्त केली. तसेच कोर्सवर आधारित लघुनाटिका सादर केल्या. त्यानंतर नांदी फौंडेशनच्या स्वाती मोरे यांनी आठ दिवस सुरु असलेल्या कौशल्याधीष्टीत कोर्सची थोडक्यात माहिती दिली.

तसेच जी कौशल्ये आ[illegible] शिकविली आहेत त्याचा आयुष्यात वापर केल्यास नक्कीच फायदा होईल असे त्यांनी सांगितले. नंतर आसावरी कुलकर्णी यांनी नांदी फौंडेशन व महिंद्रा प्राईड तर्फे असे विविध उपक्रम घेत असतो त्यामध्ये ग्रामीण भागातील मुलींसाठी असे विविध स्कील शिकणे आवश्यक असल्याने त्यांना त्याचा फायदा भविष्य काळात होतो तरी जास्तीत जास्त विद्यार्थिनींनी यामध्ये सहभागी व्हावे असे मत त्यांनी व्यक्त केले.

याज्ञसेन पाटणकर यांनी सांगितले की, आत्ताच्या ऑनलाइन युगात मोबाईलचा वापर अनिवार्य आहे परंतु तो शिक्षणासाठी जास्तीत जास्त वापर करावा. माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी ई मेल चा वापर करावा असे मत त्यांनी व्यक्त केले.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. एस.डी. पवार म्हणाले की, बदलत्या काळात फक्त पारंपरिक शिक्षण हे विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकास व त्यांचे भावी जीवन सुकर करण्यास उपयोगी पडत नाही. त्यामुळेच कौशल्यावर आधारित शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. नियमित अभ्यासक्रमाबरोबर विद्यार्थ्यांनी वेगवेगळी कौशल्ये आत्मसात केली तर त्याचा निश्चितच फायदा होतो. महाविद्यालयात असे विविध करियर कोर्स सुरु आहेत विद्यार्थ्यांनी त्यामध्ये सहभागी व्हावे. कार्यक्रमाच्या शेवटी विशाखा गुजर हिने आभार मानले तर भाग्यश्री हिरवे व काजल पवार यांनी सूत्र संचालन केले.